

ई साहित्य प्रतिष्ठान
आभास हा..
मंदार कात्रे

# आभास हा

मंदार कात्रे

ई साहित्य प्रतिष्ठान

पुस्तकाचे नांव: आभास हा
प्रकार : कथा संग्रह

लेखक : मंदार मनोहर कात्रे
फोन- 9923920265
Email-
mandarkatre007@gmail.com

मुखपृष्ठ: Last Bench Design

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान®
esahity@gmail.com
www.esahity.com
फ़ोन: 9869674820

©esahity Pratishthan® 2013

२६ सप्टेंबर २०१३

लेखक : मंदार मनोहर कात्रे
शिक्षण -इंजिनियरिंग
व्यवसाय - देश व परदेशात नोकरी
व्यासंग- व्यवसाया निमित्त अनेक देशात फिरस्ती सुरु असते . अशा वेळी स्वत:ला आणि इतरांना आलेल्या अनुभव एकत्र करून लिहित गेलो . त्यातून आज हा कथासंग्रह आकाराला येत आहे.

भारतातील पत्ता-
गाव- चोरवणे (ब्राह्मण वाडी )
नाणीज जवळ (रत्नागिरी-कोल्हापूर हायवे )
व्हाया-पाली , ता. संगमेश्वर .
जिल्हा-रत्नागिरी -४१५८०३
फोन- 9923920265

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

• या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा नाटक. सिनेमा. सिरियल. स्टेज शो किंवा तत्सम रुपांतर किंवा भाषांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे.

**ई साहित्य प्रतिष्ठान ही कवी, लेखक व वाचकांनी मिळून चालवलेली चळवळ आहे. नवीन उदयोन्मुख लेखकांसाठी हे व्यासपीठ आहे, आणि खेडोपाडी व देशविदेशी पसरलेल्या मराठी वाचकांसाठी वाचनाचे साधन आहे. ई पुस्तके. आता स्मार्टफ़ोनवर डाऊनलोड करून वाचता येतात. ब्ल्यु टुथद्वारे देता घेता येतात. आपण या चळवळीचे भाग होऊ शकता. आपल्या ओळखीच्या लोकांचे ई मेल पत्ते पाठवा. त्यांनाही विनामूल्य ई पुस्तके पाठवू. नवीन वाचक आणि नवीन लेखकांचे या चळवळीत स्वागत आहे.**

सतत सामाजिक जाणिवेचे भान ठेवून,
प्रसंगी पदरमोड करून,
समाजासाठी आयुष्य जगणारे
माझे बाबा,
**मनोहर विश्वनाथ कात्रे**
यांना हे पुस्तक सादर समर्पित.
-मंदार मनोहर कात्रे

या सर्व कथा, यातील पात्रे, नावे काल्पनिक आहेत. पण त्यांना आधार आहे तो वास्तवाचा, आणि अनुभवाचा. आणि यातून मनोरंजनाबरोबरच जागृती व्हावी हीच लेखकाची तळमळ आहे.

# प्रस्तावना

“मंदार कात्रे” ही व्यक्ती रुढ अर्थाने लेखक किंवा लेखकाच्या 'प्रस्थापित' व्याख्येत अजिबात फिट बसणारी नाही, आणि त्या व्याख्येत फिट न बसणं हेच मंदार कात्रेंच्या पारदर्शक लिखाणाचं एक महत्वाचं वैशिष्ट्य आहे असं मी मानतो.

त्यांचं प्रत्येक लिखाण हे अनुभवजन्य आणि मनमोकळं आहे. लिखाणातला प्रत्येक शब्द जरी साहित्यिक दृष्टीने आपण ज्याला वजनदार असा म्हणतो तसा नाही, या उलट तो सर्वसामान्य वाचकांच्या मनाला भावणारा, भावस्पर्शी असा आहे. परदेशात व्यतित केलेला काळ, त्यात आलेले बरेवाईट अनुभव, भेटलेली माणसे, त्यांचे विचार आणि त्यांची मानसिक घालमेल अतिशय उत्तमप्रकारे लेखनातुन व्यक्त करण्याचे कसब मात्र कात्रेंना व्यवस्थित अवगत झालेले आहे हे नक्की. त्यांच्या कथा या लहान पण परिणामकारक असुन अनेक नविन युवक युवतींना बोधप्रद ठरणाऱ्या आणि एका नविन व काहीशा अज्ञात अशा भावविश्वाची ओळख पटविणाऱ्या आहेत. कोणताही साहित्यिक अभिनिवेश न आणता अत्यंत सरळ सोप्या आणि आपल्याला परिचयाच्या अशा भाषेतुन व्यक्त झालेले अनुभव हे अनेकांना लाभदायक ठरावेत. मंदार कात्रेंच्या या पुस्तकाला माझ्या मन:पुर्वक आणि हार्दिक शुभेच्छा...त्यांचा हा व्यासंग असाच बहरत राहो ही सदिच्छा व्यक्त करतो

-सचिन मधुकर परांजपे (पालघर)

# कथानुक्रम

1 आभास हा
2 चकवा
3 डॉन
4 स्टोरी ... सलीलची
5 वेंकट
6 भूलभुलैया
7 अवलिया

# आभास हा

चंदूचं आयुष्य तसं एककल्लीच! सकाळी उठावं, चहा घेवून बाईकला किक मारावी, गल्लीतल्या किराणा मालाच्या दुकानातून १० गुटख्याच्या पुड्या घ्याव्यात, एक तिथेच फोडून तोंडात टाकावी आणि दिवसाचा शुभारंभ करावा ! मग थोडं चावडीवर भटकून इकडच्या-तिकडच्या गप्पा माराव्यात आणि बातम्या काढाव्यात आणि मग सरळ घर गाठावं. अंघोळ-पूजा उरकून आईने दिलेला डबा घेवून मग कंपनी गाठावी....

कोकणातलं समुद्रकिनाऱ्यावरचं गाव! १५ वर्षापूर्वीच इथं एक परदेशी कंपनी आली, लोकांनी खूप विरोध केला पण शेवटी कंपनी राहिलीच! मग चंदू ला कंपनीत मुकादम म्हणून काम लागलं. तसा होता चंदू आयटीआय केलेला! पण कामासाठी बाहेरगावी जायचं तर आई सोडेना, बाबा लहानपणीच सोडून गेलेला, घरची एवढी मोठी बागायत आणि आंब्या-फणस-काजू ची बाग /गुरे–ढोरे! मग आई घाबरली. चंदुला

म्हणाली, “बाबा चंदू, गावाजवळ कुठं काम मिळतं का बघ बाबा, मी नाय तुला मुंबईला पाठवणार. इकडं कोण रं करील इतक्या गुरांचं आणि शेती-भाती?”

झालं, मग चंदूला आपला आळशीपणा लपवायचं कारणच मिळालं की! पण त्याच्या दुर्दैवाने ही कंपनी सुरु झाली आणि आईने एका स्थानिक राजकारण्याचा वशिला लावून चंदूला तिकडे चिकटवला आणि चन्दूची उंडगेगिरी बंद झाली. मग चंदूची नोकरी सुरु झाली. सकाळीं ९ ते संध्याकाळी ६, मध्ये १ तास सुट्टी-जेवायला! पगार १५०००/- रुपये.

घरावरून कामाच्या ठिकाणी जायला मध्ये लाँचने (होडी) खाडी पार करावी लागायची! मग चंदू घरून सायकलवरून बंदरापर्यंत जायचा, लाँच आली की सायकलसकट नंदू आत बसायचा आणि पलीकडच्या धक्क्यावर उतरून पुन्हा सायकलने कंपनीत जायचा, येताना पुन्हा तसेच!

तर झालं असं की एकदा लाँचने चंदू कंपनीत जात असतानां एक नवीन मुलगी त्याला दिसली. दिसायला छानच होती. मस्त गुलाबी साडी, सुबक बांधा आणि खाडीच्या वाऱ्यावर उडणारे लांबसडक केस ! चंदूला तर ती स्वप्नातली परीच वाटली ! आतापर्यंत आयुष्यात चंदूने अशी पोरगी पहिली नव्हती! दिसता क्षणी प्रेमात पडावं अशी... एकदा तर चंदुला वाटलं जावं आणि नाव विचारावं. पण ते धाडस त्याच्याने

होईना! मग तो तसाच एकटक तिच्याकडे पाहत राहिला, तेवढ्यात किनारा कधी आला आणि बोट धक्क्याला कधी लागली तेही नाही कळलं त्याला !

दिवसभर मग कंपनीत तिचाच विचार! कामात मन लागेना! तश्याच तिच्या विचारांच्या धुंदीतच दिवस गेला,आणि... चंदूचा डोळ्यावर विश्वासच बसेना! परत येताना बोटीत तीच! अरेच्चा! चंदू तर आनंदाने वेडा व्हायचाच बाकी राहिला! स्वारी एकदम खुश! त्याने ठरवलं, हिची माहिती काढायची! त्याची रात्र मग तिच्याच स्वप्नात गेली, झोप कधी लागली आणि उजाडलं कधी तेही कळलं नाही. आईने मोठ-मोठ्याने हाका मारून उठवलं तेव्हा कुठे जाग आली! चंदू मग पटापट तयार होवून कामावर निघाला. आजही बोटीत ती होतीच. मग चंदूने आपला जिगरी दोस्त परश्याला तिची बातमी काढायला सांगितलं आणि परत येताना संध्याकाळी बोटीत परश्याला ती दाखवलीही.

परश्याने २ दिवसात तिची सगळी माहिती काढली. तिचं नाव मोहिनी, ती त्याच्याच कंपनीत नवीनच कामाला लागली होती. स्टोअर डीपार्टमेंटला.  अन् ती राहायलाही चंदूच्याच गावात होती, भाड्याने खोली घेवून! चंदू आनंदाने वेडा झालां. मग पुढची सगळी सेटिंग चंदू आणि परश्याने व्यवस्थित केली आणि एकदा चंदूने धीर करून तिला विचारलंच!

चंदू तसा दिसायला बऱ्यापैकी होता. त्यात आता प्रेमात पडल्यानंतर त्याने नवीन इस्त्रीचे कपडे, अत्तर इत्यादी छानछोकी करायला सुरवात केली. तो गावात राहूनही आणि वासुगिरी करूनही त्याचं बोलणं गावंढळ नव्हतं. त्यामुळे तिलाही तो थोडाफार आवडला होता. पण एकदम होकार देण्याऐवजी थोडं भाव खावूनच मग तिने होकार दिला... आणि मग काय मंडळी, पुढच्या दिवाळीतच चंदूच्या लग्नाचा बार वाजला! आईसुद्धा एवढी देखणी आणि नोकरीवाली सून मिळाली म्हणून आनंदात होती! चंदू आता चंद्रावर पोचला होता !

चंदूचे दिवस मजेत जात होते! असेच ५-६ महिने गेले पण अलीकडे मोहिनीला कामावरून यायला उशीर होऊ लागला. पूर्वी ते दोघे एकदमच कामावर जात आणि परत येत, आता चंदूने मोटरसायकल पण घेतली होती पण हल्ली रात्रीचे ८-९ वाजले तरी मोहिनी येत नव्हती. कधी कधी तर ११-१२ सुद्धा. मग उशीर झाला की कंपनीची बोट तिला सोडायला यायची! चंदूने विचारले तर कंपनीत काम वाढलंय म्हणून संगायची... हळू हळू तिच्या अंगावर अनेक दागिनेही दिसू लागले, चंदूने चौकशी केली तर ओव्हर-टाईमच्या पैश्यातून घेतले आहेत असे सांगायची... तरीही चंदूच्या मनात शंकेची पाल चुकचुकू लागलीच !

आणि त्या दिवशी तर कहरच झाला. त्या रात्री मोहिनी घरी आलीच नाही. आली ती एकदम दुसऱ्या दिवशी सकाळी ! आता मात्र चंदूचा फ्युज उडाला! इतके दिवस जे मनात खदखदत होतं ते बाहेर आलं. चंदूने मग परश्याला विश्वासात घेवून सगळं सांगितलं. परश्याने

२-३ दिवसात जी माहिती आणली त्याने तर चंदूच्या हातापायातील बळच गेलं. संतापाने त्याच्या मेंदूची लाहीलाही झाली. स्टोअर डीपार्टमेंटचा मॅनेजर शुक्ला तसा हरामीच! पण दिसायला गोरा-गोमटा आणि बोलायला एकदम गोडगोड! या शुक्लाने मोहिनीला आपल्या जाळयात ओढली होती. तिच्यावर पैश्याची खैरात करून तो तिला रात्री थांबवायचा आणि नको ते रंग उधळायचा!

हे समजल्यावर चंदूला काहीच सुचेनासं झालं. आपल्या बायकोनेच आपला विश्वासघात केला. आणि या हरामखोर शुक्लापायी? चंदूच्या तळपायाची आग मस्तकात गेली. आणि कधी नव्हे ती त्याची पावलं दारूच्या गुत्त्याकडे वळली. १-२-३-४ ...चंदू ग्लासच्या ग्लास रिते करीत गेला... आणि मग कधीतरी उशिरा रात्री गुत्त्याबाहेर पडून बाईकला किक मारली... परत येताना नेमका शुक्ला जीप घेवून समोरून आला, आधीच चंदू प्यालेला, त्यात या शुक्लाच्या पायीच आपली बायको आपल्याशी बेईमान झाली या विचाराने तो हैराण झाला. आता या शुक्लाला धडा शिकवायचाच ! चंदूने आपल्या बाईकचा स्पीड तुफान वाढवला आणि मागचा पुढचा विचार न करता सरळ बाईक शुक्लाच्या जीपवर चढवली !

जाग आली तेव्हा चंदू हॉस्पिटल मध्ये होता. उजव्या हाताला आणि पायाला भलेमोठे बँडेज! उठताही येईना! तेवढ्यात आई, मोहिनी आणि परश्या समोरून खोलीत आले. डॉक्टर जे म्हणाला ते ऐकून त्या दुखण्यातही चंदूच्या जीवाला फार बरे वाटले. “अरे चंदू केवढा मोठा

एक्सीडेंट! नशीब म्हणून वाचलास ! ठोकर बसल्यानंतर त्या शुक्ला साहेबांची गाडी रस्त्यावरून नदीत पडली आणि त्यातच त्यांचा अंत झाला रे !”

इकडे मोहिनी डोळे पुसत होती आणि परश्या मात्र चंदू कडे बघत गालातल्या गालात हसत होता !

# चकवा

कुवेत एअरवेजचे फ्लाईट ३११ मुंबईच्या छत्रपती शिवाजी विमानतळावरून आकाशात झेप घेत होते, तसतसे आशिषचे विचारही मणामणाचे ओझे उतरावे तसे हलके होत होते. गेले १० महिने आणि त्या काळातल्या घडामोडी एखाद्या चित्रपटासारख्या त्याच्या डोळ्यासमोर येऊ लागल्या. गेले एक दोन दिवस नव्हे तर चक्क १० महिने आपण असे झपाटल्यागत कसे काय वागत होतो? याचा विचार करूनही त्याला उत्तर सापडेना !

रचना! एखाद्या स्वप्नातल्या परीसारखी! गोव्याला कॉलेजच्या दुसऱ्या वर्षात असताना पहिल्याच दिवशी एक नवीन चेहरा दृष्टीस पडला. नजरानजर झाली आणि तिने चक्क स्माईल दिलं! आशिष मनातून खुश झाला. मग रोजच स्माईलची देवाणघेवाण सुरु झाली. कधी "गुड मॉर्निंग" तर कधी कॉफी, ओळख वाढत गेली. तिचे मनमुराद खळखळून हसणे आणि दिलखुलास स्वभाव याची मोहिनी कधी आशिषवर पडली आणि कधी ती त्याच्या स्वप्नात शिरली ते आशिषला कळलंच नाही.

ती पहिल्या वर्षाला होती तर आशिष दुसऱ्या ! आशिष त्याच शहरात लहानाचा मोठा झालेला तर ती १०० किमी वरच्या दुसऱ्या गावातून आलेली, होस्टेलला राहायची! त्यामुळे कॉलेज-जीवनातले, अभ्यासातले बरेवाईट अनुभव त्याने तिच्याशी शेअर केले, अनेक खाच-खळगे, प्राध्यापकांच्या सवयी, लकबी आणि शिक्षकांचे मन जिंकण्याच्या खुबी त्याने तिला समजावून दिल्या, हळूहळू अभ्यास /नोट्स आणि इतर कारणांनीही भेटीगाठी वाढू लागल्या. तीही हळूहळू त्याच्याकडे ओढली जात होतीच पण "प्यार का इजहार" मात्र झाला नव्हता.

बघता-बघता २ वर्षे उलटली आशिषचे कॉलेज संपले आणि ती होती शेवटच्या वर्षाला. नोकरी लागल्यावर लग्नाचे विचारायचे असे आशिषने ठरवले होते. आशिषला शहरातल्याच एमआयडीसीमध्ये ट्रेनी इंजिनियर म्हणून जॉब लागला. तो रुळला देखील नव्या नोकरीत, दिवस मस्त चालले होते. शनिवार-रविवार भेटीगाठी सुरुच होत्या आणि शेवटी एका रविवारी संध्याकाळी बीचवर फिरताना आशिषने लग्नाची गोष्ट काढली .

तिने अतिशय शांतपणे ऐकून घेतले आणि म्हणाली," तू म्हणतोस ते खरे आहे, मीही तुझ्या प्रेमात कधी पडले ते मलाही नाही कळले रे! पण लग्न म्हणजे खूप मोठा निर्णय आहे, मी अजून घरी काही सांगितलेले नाही आणि कॉलेज संपल्यावर मला घरी परत जावे लागेल. मग आपल्या भेटी कशा होणार?" त्यावर आशिष म्हणाला,"मी तुझ्यासाठी

इकडेच जॉब बघतो ना, माझ्या आता ओळखी झाल्या आहेत इकडे. तू घरी विषय तरी काढून बघ"

दिवाळीच्या सुट्टीत रचना घरी गेली तेव्हा आई-बाबांना तिने सर्व सांगितले पण शेवटी जात आडवी आली. आशिष ब्राह्मण आणि ती इतर समाजातील! त्यामुळे ब्राह्मण घराण्यात इतर मुलगी कशी चालेल? आशिषचे आईवडील तिला स्वीकारतील का? याबाबत रचनाचे बाबा साशंक होते. पुढे काय रामायण वाढून ठेवलंय या विचाराने त्यांना आता तिची काळजी वाटायला लागली.

सुट्टी संपल्यावर रचना परत कॉलेजला आली. आशिषला तिने घडलेला सर्व प्रकार सांगितला. आशिष ही काळजीत पडला. प्रेमात पडताना जात-धर्म कोण बघतं का? आता पुढे काय? या विचाराने तो धास्तावला! पण दोघानीही प्रेमाच्या आणाभाका घेतलेल्या होत्या, आयुष्य एकमेकांबरोबर काढण्याचा दृढनिश्चय होता. पुढचे पुढे बघू, म्हणून ती आणि तो आपापल्या कामात व्यग्र झाले.

कॉलेजचे शेवटचे वर्ष संपले. रचना फर्स्ट क्लास मध्ये पास झाली आणि आशिषच्या ओळखीने एका कंपनीत ट्रेनी इंजिनियर म्हणून जॉइनही झाली. दिवस पुढे सरकत होते. हळहळू दोघांच्या प्रेमाची कुणकुण आशिषच्या घरी लागली आणि आशीषचे बाबा भयानक संतापले. आम्ही पर-जातीतली मुलगी चालवून घेणार नाही असा थयथयाट केला. तेव्हा पासून आशिष सतत टेन्शनमध्ये राहू लागला.

कंपनीतल्या मित्रांनाही हे जाणवले की आशिष कुठल्यातरी संकटात आहे, त्यांनी धीर दिला. आम्ही लागेल ती मदत करू, घाबरू नकोस.

अशीच दोन वर्षे उलटली. आशिषचा रिझ्युम नौकरी.कॉम वर होताच. त्यामुळे त्याला कुवेतच्या एका मोठ्या पेट्रोलियम कंपनीकडून इंटरव्ह्यूसाठी कॉल आला. मुंबईत इंटरव्ह्यू झाला आणि गलेलठ्ठ पगाराच्या नोकरीवर त्याची नियुक्ती झाली. आशिष मात्र एका बाजूने आनंदी, तर दुसऱ्या बाजूने रचनापासून दूर जावे लागणार म्हणून दु:खी होता. अशा द्विधा मन:स्थितीतच शेवटी त्याने रचनाचा निरोप घेतला. मी तुझी वाट पाहीन, फोन-मेलद्वारे संपर्कात राहूच! असे ठरले.

आशिष कुवेतला आला, बघता बघता तिथल्या नव्या नोकरीत रमला. कंपनीने अतिशय आधुनिक आणि आरामदायक सोयी-सुविधा दिल्या होत्या. भारत आणि कुवेत मधला जमीन-अस्मानाचा फरक, याचेच कौतुक करत नव्याची नवलाई कधी सरली ते समजलेच नाही आशिषला! कुवेतला एक वर्ष पूर्ण केल्यावर १ महिन्याची सुट्टी मिळणार होती. भारतात जावून लग्न करून घ्यावे आणि मग रचनाला इकडेच आणू म्हणजे बाबानाही त्रास नको आणि आपल्यालाही, असा विचार तो करत होता.

सुरुवातीला रचनाशी रोज फोन/मेलद्वारे बोलणे व्हायचे. तिकडचे फोटोही त्याने तिला पाठवले. पण हळूहळू रचनाकडून येणारा प्रतिसाद

कमी होऊ लागला. रोज होणारे फोन आठवड्यातून एकदा होऊ लागले... पुढे पुढे तर आशिषच्या मेलना उत्तर न देणे, फोन न उचलणे असेही प्रकार घडू लागले. त्यामुळे आशिष मनातून धास्तावलेला होता! आशिषचे कुवेतला एक वर्ष पूर्ण झाले. मुंबईत विमानतळावर उतरल्यावर अजिबात वेळ न दवडता त्याने थेट गावाकडची ट्रेन पकडली आणि घरी आला.

कंपनीतल्या मित्रांकडे रचनाची चौकशी केल्यावर जे कळले त्याने आशिष उडालाच! आशिष कुवेतला गेल्यावर मधल्या काळात रचना संदीप नावाच्या दुसऱ्या एका मुलाच्या संपर्कात आली होती. तो होता पुण्याचा, पण शिकायला इकडे होता. हळूहळू मैत्रीचे रुपांतर प्रेमात झाले आणि मागच्याच महिन्यात त्या दोघांचा साखरपुडा ही झाला !

संपले सगळे! आशिषच्या स्वप्नांचा चक्काचूर झाला. त्याने गेल्या ३-४ वर्षापासून वाढवलेले प्रेमाचे रोपटे या कुठल्याशा फडतूस संदीपने पायदळी तुडवले होते. दू:ख, अपमान, फसवणूक अशा अनेक भावनांचा हल्लकल्लोळ झाला आणि रागाच्या भरात त्याने या सगळया प्रकाराचा जाब विचारण्यासाठी रचनाच्या घरी जाण्याचे ठरवले !

दुसऱ्याच दिवशी काही जवळच्या मित्रांना घेवून आशिष रचनाच्या घरी गेला. घरी रचना, संदीप, आई-वडील आणि रचनाचा भाऊ होता. आशिषला एक शब्दही बोलू न देता दमदाटी करून संदीप आणि रचनाच्या भावाने घराबाहेर काढले. आशिष अतिशय व्यथित झाला .

घरी परत येताना आशिषच्या गाडीला अपघात झाला पण सुदैवाने त्याला फार लागले नाही. फक्त डोक्याला मुकामार लागला. २ दिवस हॉस्पिटलमध्ये काढून जेव्हा आशिष घरी आला, तेव्हा त्याला जाणवले कि काहितरी बिनसलंय... त्यानंतर त्याला रात्री नीट झोप येईनाशी झाली, विचित्र भीतीदायक स्वप्ने पडू लागली. एका रात्री तो ओरडत झोपेतून उठला तेव्हा घराच्यानाही जाणवले काहीतरी बिघडलय.

आशिषच्या बाबांनी त्यांच्या आध्यात्मिक गुरूंना आशिषची सर्व कहाणी सांगितली ,ते म्हणाले की त्या मुलीच्या मित्राने तुमच्या मुलावर काळी जादू केलेली आहे... मग आशिष आपल्या आई-वडिलांसह नाशिकला जावून विधी करून आला, तेव्हा कुठे त्याचे चित्त थाऱ्यावर आले! शेवटी आईबाबांना तुम्ही पसंत कराल त्या मुलीशीच मी लग्न करीन, असे वचन देवून आशिषने परतीच्या प्रवासाची तयारी सुरु केली. ...

या विचारांच्या तंद्रीतून आशिष जागा झाला तो विमानाच्या वैमानिकाने केलेल्या उद्घोषणेमुळे.. “थोडीही देर में कुवेत एअरवेज की फ्लाईट ३११ कुवेत अंतर-राष्ट्रीय हवाई अड्डे पर उतर रही है......” आणि मग विमानतळावर उतरल्यावर त्या गर्दीतालाच एक बनून आशिष हरवून गेला ...

# डॉन

दुबईच्या आलिशान हॉटेलच्या स्विमिंग पुलाच्या कठड्यावर बसून सिगारेटचे झुरके घेत तो बसला होता. संध्याकाळचा लालभडक सूर्य जसजसा अस्ताला जात होता, तसतसा त्याला आपला २५ वर्षापूर्वीचा भूतकाळ एखाद्या चित्रपटाप्रमाणे डोळ्यासमोर दिसू लागला...

हैदराबादमधल्या झोपडपट्टीतील ती छोटीशी खोली. पप्पा आणि मम्मी दिवसभर कामाच्या शोधात वणवण भटकत होते. घरात दोन वेळच्या जेवणाचीसुद्धा मुश्कील होती. तो आणि छोटी बहिण सुरीली तिथेच मातीच्या ढिगाऱ्यात खेळत होते. तेवढ्यात तिथे एक गाडी आली. गाडीतून ३-४ माणसे उतरली आणि त्यातल्या एका गॉगलवाल्याने त्याला एक चॉकलेट दिले. दिवसभर भुकेला असल्याने त्याने पटकन ते खाल्लेही. सुरीलीलाही एक चॉकलेट देवून ते सगळे गाडीत बसले... एवढेच! त्यापुढचे काहीच आठवेना! त्यानंतर त्याला

जाग आली तेव्हा तो एका मोठ्या बंद खोलीत होता. आजूबाजूला त्याच्याच वयाची १५-२० मुले.

बराच वेळ तो तसाच बसून होता. हळूहळू इतर मुलेही गाढ झोपेतून जागी व्हावीत तशी जागी झाली. कुणालाच कळत नव्हते काय चाललेय? सगळी रडारड सुरु झाली. पप्पा-मम्मी कुठे आहेत? सुरीली कुठाय? मी इकडे कसा आलो? माझे घर कुठे आहे? इत्यादी अनेक प्रश्न त्याच्या कोवळया मनात गर्दी करू लागले. मग त्याने इतर मुलांशी बोलायचा प्रयत्न केला पण त्यांच्या भाषा निराळया होत्या. कोणी तेलगु, कुणी कन्नड, कुणी केरळी, तर कुणी हिंदी, त्याला तर फक्त तेलगु येत होती. पण मग इतरांशी तोडक्या-मोडक्या हिंदीत संभाषण सुरु झाले. कुणालाच कळत नव्हते आपण इथे कसे आणि का आलो? पण गॉगलवाला आणि इतर चार माणसे, गाडी-चॉकलेटची गोष्ट मात्र सगळयाच मुलांची सारखी होती...

थोड्या वेळाने खोलीचे दार उघडले आणि तो गॉगलवाला आणि बाकीचे चारजण आत आले. गॉगलवाल्याचे नाव लाल्या होते हे त्यांच्या बोलण्यावरून समजले. मुले रडू लागली तशी लाल्या सगळयांना दटावून म्हणाला, “ए रोनेका नही, अब आजके बाद अपने मा-बाप को भूल जाव. घर वापस नही भेजुंगा किसीको. आजसे आपुन सब लोग दुसरी जगह जानेवाला है... उधर खाना-पिना अच्छा मिलेगा, कपडा भी मिलेगा और पैसा भी. मगर घर नही वापस जानेका... किसीने भागनेकी

कोशिश की तो जानसे मार दुंगा! समझा क्या?" लाल्याने सगळयांना धमकावून गप्प केलं आणि सर्वांना खायला पण दिलं. लाल्या मग दुसऱ्या साथीदाराला म्हणाला,"इन सबकी फोटो खिंचो, और बबलू भाय को बोलना पासपोर्ट का काम जल्दी से जल्दी होना मंगता है".

असेच २०-२५ दिवस गेले अन् एका दिवशी भल्या पहाटे सगळयांना उठवून जबरदस्तीने आंघोळ घालून नवीन कपडे घालण्यात आले आणि मोठ्या बस मध्ये कोंबून विमानतळावर नेण्यात आले. सोबत लाल्या आणि बबलू होताच. विमानतळावरील अधिकाऱ्यांना बबलूने पैशाने भरलेले एक जाडजूड पाकीट दिले आणि मग ही सगळी वरात दुबईच्या विमानात स्थानापन्न झाली. गेल्या १५-२० दिवसापासून नक्की काय चाललेय हे त्या कोवळया मुलांपैकी कुणालाही कळत नव्हते. फक्त आपण आपले घर, आई-बाबा यांच्यापासून दूर कुठेतरी चाललोय, एवढेच कळत होते. घराची आणि मित्रांची आठवण येवून सारखे रडायला यायचे पण लाल्याने दिलेला दम आठवून मुले कशीतरी गप्प बसायची. “तो” मात्र सुरुवातीपासून सतर्क होता. मुले पळवणाऱ्या टोळीबद्दल त्याने आई-बाबांच्या बोलण्यात मागे कधीतरी काहीतरी ऐकल्याचे त्याला अंधुकसे आठवत होते. आपलं अपहरण होत आहे, हे जाणवत होते. पण त्याच्या हातात करण्यासारखे काहीच नव्हते. लाल्या आणि बबलूबद्दल प्रचंड राग मात्र त्याच्या मनात धुमसत होता. विमानात बसायला मिळाले म्हणून काही मुले खुश होती पण तो मात्र उदास अन दु:खी होता. दुबईच्या विमानतळावर विमान उतरले आणि

त्याने लाल्या, बबलू आणि इतर मुलांसोबत दुबईत पहिले पाउल टाकले, पुन्हा कधीही न परतण्यासाठी!

दुबईत पोहोचल्यावर त्या सर्वांना एक मोठ्या बंगल्यात नेण्यात आले. तिथे सगळे काही होते, बाहेर प्रचंड ऊन आणि उष्णता असूनही घरात मात्र थंडगार होते. मुलांना जेवण आणि आईस-क्रीम मिळाले, सगळयांना नवीन कपडेही मिळाले. संध्याकाळी एक अरबी पोशाख केलेली व्यक्ती एका मोठ्या कारमधून आली. सगळ्या मुलांना घेवून लाल्या आणि बबलू त्या व्यक्तीबरोबर गेले. लाल्या मुलांना म्हणाला, “चलो आज तुम्हारा प्रॅक्टिस  है” एक फार मोठे विस्तीर्ण मैदान होते. मैदान कसले? वाळवंटच ते..........मग उंट आले. आणि “त्या”च्या सकट सगळ्या मुलांना उंटावर बसवण्यात आले. मुलांचे हातपाय आणि पाठीला बेल्ट लावण्यात आले, आणि मग उंटांना इशारा करताच उंट भरवेगाने धावू लागले.

तो प्रचंड घाबरला. बाकी मुलेही रडू लागली. जशी मुले रडू लागली तसे उंट अधिक जोरात पळू लागले. “व्वा व्वा बहोत खूब” तो अरब आणि लाल्या आनंदित होवून टाळया वाजवू लागले. “त्या’ची पाठ सोलून निघाली, हातपाय प्रचंड दुखू लागले. मरणप्राय वेदना सहन करत तो तसाच उंटावर बसून होता. आपण रडलो तर उंट आणखी जोरात पळतात हे त्याच्या लक्षात आले. काही वेळाने उंट थांबले आणि

मग सर्वांना खाली उतरवण्यात आले. लाल्या म्हणाला, “आजसे यही तुम्हारा काम है बच्चो. उंटकी रेसमें तुम बच्चालोग की बहोत जरुरत रहती है. जितना ज्यादा रोनाधोना और चील्लाना, उतनाही उंट जोरसे भागेगा. याद रखो, जिसका उंट पहला आयेगा, उसको इनाम भी मिलेगा”

तो आणि इतर मुले पुन्हा बंगल्यावर आली. सगळेजण श्रम आणि वेदना यामुळे गलितगात्र झालेले होते. जेवणसुद्धा न घेता सगळे तसेच झोपी गेले. सकाळी जाग आली ती लाल्याच्या आवाजाने, “चलो बच्चो,कामपर जाना है कि नही? चलो चलो जल्दी करो.” मुले तयार होईनात. “हमको नही चाहिये ऐसा काम, मेरा पुरा बदन दुख रहा है” तो म्हणाला. तसा लाल्याने त्याच्या एक सणसणीत कानफटीत लगावली. तो दाणकन जमिनीवर आपटला. “साला तेरेको हजारो रुपिया खर्च करके लाया वो क्या इधर खाना खिलाने के वास्ते? चुपचाप कामपे चल, नही तो इधर ही गाड दुंगा”

आपल्या असहाय्यतेची जाणीव होवून तो हतबल झाला, नाईलाजाने सगळी मुले पुन्हा मैदानावर. आज तर भर उन्हात शर्यतीची तयारी होती. ३ तास सतत उन्हात उंटावरून रपेट झाली, काही मुले तर उंटावर बसल्या बसल्याच बेशुद्ध पडली. मग बंगल्यात आल्यावर त्यांच्यावर डॉक्टरने उपचार केले. दुसऱ्या दिवशी पुन्हा तोच प्रकार,

आज त्याच्यासोबत आणखीही २-३ जण कामावर जायला तयार नव्हते, मग लाल्या आणि बबलूने त्यांना तुडव-तुडव तुडवले. मग पुन्हा सगळेजण मैदानावर आणि पुन्हा शर्यतीचा सराव, आज तर चांगले ५ तास...

अनेक मुले आजारी पडली पण कुणाचीही या शर्यतीच्या नरकवासातून सुटका नव्हती. "बच्चा बीमार होगा तो और ज्यादा रोएगा, सबको ले जाव" लाल्या बबलूला म्हणाला... आणि त्या दिवशी मात्र त्याच्या संयमाचा बांध फुटला. कारणही तसेच घडले, अतिश्रम, वेदना आणि आजार यामुळे त्यांच्याबरोबर आलेला एक मुलगा उंटावरच बेशुद्ध पडला आणि बेल्ट सैल असल्याने खाली पडला. कोणालाही काही कळायच्या आतच तो मुलगा जग सोडून निघून गेला. प्रचंड दु:ख आणि संतापाने धुमसत "तो" बंगल्यावर आला. काहीही होवू दे. या नराधमांना शिक्षा ही करायचीच! असे त्याने मनोमन ठरवले...

शेवटी शर्यतीचा दिवस आला. भर उन्हात सुमारे तीन तास शर्यत चालली. त्याचाच उंट पहिला आला. अरब, बबलू आणि लाल्याने जल्लोष केला. त्याला चक्क १०००/- रुपये इनाम म्हणून दिले. पण तो मनातून आनंदी नव्हता. आपलं हरवलेलं बालपण, मित्र आणि आईबाबाना हिरावणारी, बालपण अमानुषपणे कुस्करणारी हीच ती नराधम नीच माणसे आहेत, हे तो विसरला नव्हता.

पुढे मग आणखी शर्यती होऊ लागल्या. त्याला चांगले कपडे, खाणे-पिणे मिळायचे. इनामही मिळायचे...

दिवस जात होते. तो शर्यती जिंकत होता... आणि ती चौकडी त्यांच्या जीवावर लाखो रुपये जिकत होते...

होता होता ६ वर्षाचा काळ लोटला. तो आता १४ वर्षांचा झाला. एक दिवस त्याने लाल्या आणि बबलूचे बोलणे चोरून ऐकले, “अब ये बच्चे बडे हो गये है, किसी काम के नही. अब दुसरा बच्चा लाना पडेगा.”

त्याने ठरवलेली वेळ जवळ आली होती. इनामाचे जे पैसे मिळायचे, त्यातून १५-२० हजार रुपये त्याने साठवले होते. दुबईत मुंबईतला एक माणूस त्याच्या चांगल्या ओळखीचा झाला होता, त्याच्याकडून १५ हजाराला त्याने पिस्तुल विकत घेतले आणि एका रात्री लाल्या नी बबलू दारू पिवून झोपलेले असताना दोघांचा खात्मा केला.

आता मात्र तो घाबरला. जायचे तरी कुठे? आणि खून उघडकीला आला तर? इतक्या लहान वयात भोगलेले अपरिमित दु:ख आणि आता तर चक्क खून! त्याचे मन मेले होते ...........

मग मुंबईच्या दोस्ताने त्याला त्यांच्या टोळीत सामील करून घेतले. त्यांची टोळी दुबईतून मुंबईत ड्रग आणि सोने स्मगल करायची.............

हळूहळू आपले बालपण, दु:ख, संघर्ष सगळे विसरून तो चक्क एक स्मगलर बनला .....................

आणि काही वर्षांनी त्या टोळीचा प्रमुख.

...............................डॉन!

**(१९८० ते ९० च्या दशकात भारतातील मुले पळवून उंटाच्या शर्यतीसाठी अरबी देशात नेली जायची, तिथे त्यांचे अनन्वित हाल व्हायचे, या सत्य घटनेवर आधारित कथा लिहिण्याचे गेली १० वर्षे मनात घोळत होते. वाचकांनी कृपया आपल्या सूचना व अभिप्राय द्यावेत, ज्यायोगे ही कथा अधिक जिवंत / परिपूर्ण होईल. धन्यवाद...मंदार कात्रे )**

# स्टोरी सलील ची ...

आज सकाळीच सलीलचा फोन आला,चांगला तासभर बोलला. मीही भारावलो. चक्क अमेरिकेतून फोन! बोलणे झाल्यावर फोन खाली ठेवला आणि माझं मन सलीलच्या भूतकाळात निघून गेलं...

३० वर्षांपूर्वीची गोष्ट. सलील, माझ्या भावाचा एक मित्र. याचे वडील एका कारखान्यात मॅनेजर. पण स्वभाव लहरी. घरी बायको आणि एक मुलगा. पण त्या काळात सुमारे ३० हजार रुपये महिना पगार असलेली नोकरी सोडून माथेरानला हॉटेल काढायचे खूळ डोक्यात शिरले. नोकरी सोडून हॉटेल काढलेही. पण पार्टनरने फसवल्यामुळे यांच्या हाती राहिले धुपाटणे! त्यात यांना रमीचा नाद. एकदा रमी खेळायला बसले म्हणजे ३-३ दिवस हलायचे नाहीत. मग घरच्यांना शोधून आणावे लागायचे क्लबमधून. आणि तोपर्यंत पगाराची रक्कम संपलेली असायची रमीत हरून!

मग हॉटेलमध्ये फसले म्हणून एक कापड-गिरणी विकत घेतली. तीही दुसऱ्या मित्राबरोबर पार्टनरशिपमध्ये! तिथे पुन्हा तोच प्रकार. मग गिरणीसद्धा लिलावात निघाली. अशा सगळ्या परिस्थितीत सलीलच्या आयुष्याची मात्र लहानपणापासून फरफट झाली. वयाच्या ८व्या वर्षी आई जग सोडून गेली. मग बाबांनी दुसरे लग्न केले आणि सलीलची रवानगी पाचगणीच्या बोर्डिंग स्कूल मध्ये. अशाही परिस्थितीत सलील अभ्यासात अतिशय हुशार होता. काही नातेवाईकानी थोडीफार मदत केली, अतिशय मन लावून त्याने बारावी पूर्ण केली. कॉलेज केले आणि एका चांगल्या कंपनीत जॉईन झाला.

पण इथेही त्याच्या दुर्दैवाचे दशावतार संपले नाहीत. नेमक्या पगाराच्या दिवशी बाबा यायचे आणि मला कर्जाचे हफ्ते फेडायचे आहेत असे सांगत अर्धा-अधिक पगार घेवून जायचे! शेवटी तो कंटाळला आणि नोकरीचा राजीनामा देवून दूर कुठेतरी अज्ञात-वासात निघून गेला...

या गोष्टीला १५ वर्षे उलटली...मध्ये त्याचा काहीच संपर्क नव्हता आणि २ वर्षापूर्वी मी फेसबुक उघडल्यावर पाहतो, तर एक नवीन फ्रेंड रिक्वेस्ट आलेली. सलील देशमुख! मी चाट पडलो. नाव ओळखीचं होतं. पण नक्की कोण ते लक्षात येईना ...मग जरा मेंदूला ताण दिल्यावर आठवलं, अरे हा तर आपला सलील! मी चटकन फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारली आणि चॅटिंग बॉक्स उघडला .तो ऑनलाइन होताच! कुठे आहेस? माझा पहिला प्रश्न ! पलीकडून उत्तर – अमेरिका !

मी आश्चर्याने थक्क झालो. परिस्थितीने इतकी कडक परिक्षा घेतलेला सलील चक्क अमेरिकेत? पण खूप बरेही वाटले! मग मी माझा फोन नंबर दिला अन् त्याने फोन केला. खूप बोलला. भरभरून... तो,बाबा,आई आणि अमेरिकेबद्दलही.

नोकरी सोडल्यावर बाबांच्या स्वभावाला वैतागून त्याने त्यांच्याशी असलेले सर्व संबंध तोडले. इतर कुणालाही काहीही न सांगता तो गोव्याला गेला. तिथे चांगले सहा महिने होता. छोटीशी नोकरी करत. त्यातून ५० हजार साठवले आणि एका जुन्या मित्राने २ लाख दिले. पासपोर्ट होताच. शेवटी क्युबाला जाणारी बोट पकडून तो क्युबाला पोचला. तिथून मग एजंट्सना पैसे चारून अमेरिकेत अनधिकृत प्रवेश !

त्यानंतर मग कुठे शेतमळ्यात मजूर म्हणून, तर कधी गॅरेज मध्ये /धाब्यावर... मिळेल आणि पडेल ते काम करत दिवस काढले. शेवटी एका दूरच्या मित्राची भेट झाली आणि त्याच्या ओळखीने एका मॉलमध्ये काम मिळाले... अशी गेली १०-१२ वर्षे त्याने अमेरिकेत काढली. महिना उत्पन्न १५००-२००० डॉलर्स! जगण्यापुरते काम !

मी विचारले ,अरे लग्नाचे काय? तिकडे मिळाली नाही का कोणी? तर म्हणाला ,अरे कसले लग्न आणि कसले काय? इथे जगण्याचे वांदे

झालेत, अरे रोज संध्याकाळी भूतकाळ खायला उठतो रे... मग मी आणि बाटली... बस्स... दुसरे आहे कोण आपल्याला? मी निरुत्तर!

बरं पुढे काय ठरवले आहेस? इकडे परत येणार का? तर म्हणाला होय, यायची इच्छा खूप आहे. समुद्रकिनारी एखादे छोटेसे घर असावे अशी खूप इच्छा आहे रे! आत्ता वय आहे ४५, आणखी ४-५ वर्षे काही पैसा जमतो का ते पाहतो आणि मग येणार परत !

फोन ठेवला आणि माझं मन सुन्न झालं!

# वेंकट

नमस्कार

मी वेंकटेशन अय्यर

हस्तांदोलन करीत तो म्हणाला. आज तो नावाने आमच्या टीम मध्ये सामील होत होता. ओमान मधील “पी डी ओ” या प्रथितयश कंपनीच्या आलिशान कार्यालयात आमच्या ग्रुप मध्ये आजपासून हा नवीन “मल्लू” जॉईन झाला होता. अशा अनेक “मल्लू”सोबत आजतागायत काम केले असल्याने त्यात विशेष काहीच वाटले नाही... आमच्या ग्रुपचा अन्वर नावाचा दुसरा एक मराठी सदस्य मला हळूच मराठीतून म्हणाला... “चला, आणखी एक यंडूगुंडू आले रे...” मीही हसून अन्वर कडे पहिले आणि कामात गर्क झालो...

लंचब्रेक मध्ये सगळेजण हास्यविनोद करत असताना अय्यर मात्र शांत आणि गंभीर होता... माझ्या ते लक्षात आले, कदाचित परदेशात नोकरीचा पहिलाच दिवस... त्याचे टेन्शन असेल म्हणून मी दुर्लक्ष

केले... पण संध्याकाळी कॅम्पवर गेल्यावरही तोच प्रकार.. हा आपला आपला एकटा-एकटाच... असेच ४-५ दिवस चालले. शेवटी मी न राहवून ऑफिस सुटल्यावर संध्याकाळी कॅम्पवर त्याच्या रूम मध्ये गेलो. स्वारी अगदी शुभ्र धोतरात होती... अंगात जानवे आणि कपाळाला गंध... उदबत्ती निरंजन लावलेले आणि तोंडाने मोठ्या आवाजात स्तोत्र-पठण सुरु....

“तुम ब्राह्मिन है क्या?” मी विचारले. “हा साब” तो म्हणाला ... “मै भी ब्राह्मीन है, लेकीन मै तुम जैसा इतना पूजापाठ नही करता बाबा” मी म्हणालो... तसा तो उत्तरला... “साब,मै आपको क्या बतावू? ये पूजापाठ एक साधन है अपने दुख को छिपाने का, मेरी स्टोरी सुनोगे तो जान जावोगे क्यों मै ऐसा हूं...”असे म्हणून त्याने आपली स्टोरी सांगायला सुरवात केली ...

केरळमधील पलक्कड जिल्ह्यातील राजावाडी गावाचे प्रमुख पुजारी राधास्वामी अय्यर. गावातील देऊळ त्यांच्याच ताब्यात. गावातील सगळे धार्मिक कार्यक्रम त्यांनीच करायचे. राधास्वामी होतेच वेदशास्त्रसंपन्न. आजूबाजूच्या ५०-६० गावात राधास्वामी इतका मोठा वेदविद्वान नव्हता. राजावाडी गावात मोठे घर, शेती आणि गावातील सगळी पूजा/यज्ञ/ लग्न/समारंभ हे राधा स्वामींचे उत्पन्नाचे साधन. पत्नीचे नाव लक्ष्मी तर वेंकट हा मुलगा. वेंकट होता तिसरीला. अभ्यासात प्रचंड हुशार. पण वडिलांचा पारंपारिक व्यवसाय पुढे

चालवायचा म्हणून वेंकटला ८ व्या वर्षीच पलक्कडला वेदशाळेत पाठवण्यात आले.

तिथून वेन्कटची ओढाताण सुरु झाली. त्याला शाळा शिकायची होती. खूप मोठे व्हायचे होते. गावातील इतर घरातील बरीचशी माणसे दुबईला नोकरीला होती. ती सुट्टीला गावी येत तेव्हा त्यांची ऐट पाहून वेंकटला नवल वाटे. इतर मुले बाबांनी दुबईवरून आणलेली नवीन नवीन खेळणी घेऊन खेळत, तेव्हा वेंकटला वाटे, आपल्याला का नाही अशी खेळणी मिळत? तो आईला विचारी, हट्ट करी, तू पण बाबांना सांग ना दुबईला जायला... पण आई त्याची समजूत काढून म्हणे, अरे बाबा, आपण तर पंडित आहोत... आपण नसते जायचे बाळा तिकडे... मग तो पुन्हा म्हणे... पण मी जाणार मोठा झाल्यावर दुबईला... आई कशीतरी त्याला गप्प करी....!

त्यात आता तर शाळा सुटली... आता वेदशाळा... म्हणजे आयुष्यभर पूजापाठ करून जीवन जगावे लागणार... त्याचे मन बंड करून उठे.... कित्येक दिवस तो जेवतही नसे... कशीबशी २ वर्षे काढली तिथे. अजून ३ वर्षे बाकी होती आणि एक दिवस.... एक दिवस त्याला पलक्कड मधील एक मित्र राघवन भेटला. त्याचे वडील दुबईला होते. त्याच्याकडे पैसेही भरपूर असायचे..... वेंकटची अवस्था त्याला बघवेना... “तुला पळून जायचे आहे का इथून? मी मदत करतो तुला” तो

म्हणाला. “अरे पण पळून जाणार कुठे?” “माझे काका आहेत त्रिवेंद्रमला, चल आपण दोघेजण त्यांच्याकडे जावू...” राघवन ने धीर दिला .

आणि मग एके दिवशी वेदशाळेला कायमचा रामराम ठोकून ट्रेनने वेंकट राघवनसह त्रिवेंद्रमला पोचला. निघताना वेंकट खूप रडला. कारण आपण वेदशाळेतून पळालो हे समजल्यावर बाबा कधीही क्षमा करणार नाहीत. यापुढे आई-बाबा आणि गाव, सगळयाला विसरावे लागेल हे त्याने ओळखले होते. तरीही जिद्दीने आणि राघवनच्या दिलाश्यामुले तो त्रिवेंद्रमला गेलाच. तिथे गेल्यावर राघवनने वेंकटची सारी कहाणी काकांना सांगितली...काका उदार आणि दयाळू मनाचे होते. त्यांनी वेंकटला आपल्या घरी ठेवून घेतले आणि त्याच्या शिक्षणाची सगळी जबाबदारीसुद्धा स्वीकारली. अट एकच, नोकरीला लागल्यावर झालेला सर्व खर्च वेंकटने परत करायचा!

ती अट वेंकट ने मान्य केली आणि आनंदाने तो त्रिवेंद्रमच्या शाळेत जावू लागला. राघव पलक्कडला परतला. पण वेंकटविषयी कोणालाही काहीही सांगितले नाही. वेदशाळेतून वेंकट गायब झाल्याचे कळल्यावर राधास्वामीनी आकाश-पाताळ एक केले. खूप शोधाशोध केली. पण वेंकटचा ठावठिकाणा सापडला नाही. वेंकट कुठेतरी शिकण्यासाठीच गेला आहे, याची खात्री त्यांना होती...

काळ पुढे सरकत होता, जात्याच हुशार असलेल्या वेंकटने इंजिनियरिंग पूर्ण केले आणि आणि तिथल्याच एका कंपनीत ट्रेनी म्हणून

जॉब करू लागला ...तेवढ्यात राघवनच्या वडिलांनी त्यांच्या ओमान मधल्या मित्राच्या मदतीने ओमानमधल्या कंपनीसाठी वेंकटची शिफारस केली. इंटरव्ह्यू झाला आणि हां हां म्हणता जेट एअरवेजच्या विमानाने वेंकट ओमानला पोचलादेखील!!!

तर अशी ही वेंकटची स्टोरी..

“तो अब तुम उदास क्यो हो?”मी विचारले.

तर तो म्हणाला, “साब अभी एक बात मुझे बहुत परेशान कर रही है| मै अपने पिताजी, मां और गावको कभी देख पाऊंगा? क्या सोचेंगे वो?”

मी म्हणालो.. “घाबरू नकोस, त्या परमेश्वराच्या इच्छेने आणि आशीर्वादाने तुझे स्वप्न पुरे झाले आहे,तोच तुला मार्ग दाखवील...”

त्या दिवसापासून मनावरील ओझे हलके झाल्याने वेंकट खूप मोकळा मोकळा वाटत होता... हळूहळू तो रुळला... एक वर्ष संपले... आता सुट्टीला तो घरी जाईल... पण सुट्टीत ३ महत्त्वाची कामे आहेत... पहिले म्हणजे आई-वडिलांना भेटणे, राघवनच्या काकांचे पैसे देणे

...आणि तिसरे म्हणजे........नाजूक काम.... राघवनच्या काकांच्या मुलीशी साखरपुडा..........................!!!

# भूल-भुलैया

चार वर्षापूर्वीची गोष्ट. शुक्रवारची सुट्टी असल्याने लंचनंतर वामकुक्षी काढून जरा आमच्या कॅम्पबाहेर फेरफटका मारावा म्हणून बाहेर पडलो. इथे दम्ममला संध्याकाळचे चार वाजले तरी अजून उष्मा जाणवत होताच! सौदीला आल्यापासुन दोन महीने आराम असा नव्हताच! अगदी वीकली ऑफसुद्धा कॅन्सल केले होते. इतक्या दिवसानी सुट्टी मिळाली म्हणून जरा एंजॉय करायचा मूड होता म्हणून अल-खोबर वरुन विक्रांतला फोन करून बोलावलं होतं. तो गाडी घेवून पाच वाजेपर्यंत पोहोचणार होता. तोपर्यंत पायी फेरफटका मारावा म्हणून निघालो आणि चालत चालत कॅम्प पासून दीड-दोन किलोमीटर वर आलो.

सगळीकडे रखरखीत निर्मनुष्य वाळवंट पसरले होते. रस्त्यावरच्या वाहनांची वर्दळ सोडली तर इथे २०० -३०० किलोमीटर प्रवास केला तरी मानवी अस्तित्वाची खूण सापडणे महामुश्किल काम! मधून मधून खुरटलेली हिरवी झुडपे, त्यातच समुद्रकिनारच्या जमिनीत मात्र

दलदलीमुळे थोडीफार दाट मॅनग्रोव्हची झुडपे होती. तिथे मात्र थोडी हालचाल होती.

३० - ४० उंट घेवून एक राखणदार तिथे उभा होता. जवळ जावून पहिले तर चक्क भारतीय निघाला. मी कुतुहुलाने विचारले, क्यों भैय्या? नाम क्या है? तो उत्तरला, नमस्ते साहिब, मै दिलीपकुमार विश्वकर्मा. बलिया – युपी से हूं.

अरे व्वा, मी म्हणालो, इधर कैसे?

तो म्हणाला, बाबूजी क्या बतावू? बडी लंबी कहानी है.

तेवढ्यात विक्रांतचा फोन आला, तो गाडी घेवून आला होता कॅम्पवर. मग मी त्याला गाडी घेवून इकडेच ये असे सांगून तिथवरचा रस्ता तोंडी सांगितला. पाच मिनिटात तो गाडी घेवून आलाही! हाय-हॅलो झाल्यावर म्हणाला, अरे इकडे काय करतोस? चल, आज सुट्टी वाया घालवायचीय का? मस्त long drive करून येवू जेद्दाहला ! पण मी म्हणालो, थांब रे जरा. जावू उशिराने. अरे या भैय्याची स्टोरी तर ऐकूया!

मग भैय्या घाबरत घाबरत आपली स्टोरी सांगू लागला. त्याचे डोळे पाणावले होते, चेहरा करुण दिसत होता. बायकामुलांना घरी

सोडून बरोबर तीन वर्षापूर्वी बलियाच्या जवळच्या एका गावातून तो मुंबईला पोटा-पाण्यासाठी आला. अंधेरीत एका बिल्डिंगचे कन्स्ट्रक्शन सुरू होते. तिथल्या मॅनेजरशी विश्वकर्माच्या मित्राची ओळख होती. मग तिथे बिल्डरकडे लहानसहान कामे करू लागला. मोलमजुरी करता करता तिथे बिल्डिंगचे एलेक्ट्रिकचे काम करणाऱ्या मंडळींशी त्याची चांगली दोस्ती जमली. त्यांनी त्याला इलेक्ट्रिकल मधले बेसिक काम शिकवले. मूळचा तो सातवी फेल होता पण तसा चलाख होता. सहा-सात महिन्यात तो चांगला तयार झाला आणि मग मोलमजुरीचे काम सोडून तो इलेक्ट्रिक वायरिंगचे काम करणाऱ्या त्या ग्रुप बरोबर काम करू लागला.

त्यातच त्या ग्रुपमधल्या शोभन बॅनर्जी या बंगाली टेक्निशियनने पासपोर्ट काढलेला होता. त्याने नुकताच एका दुबईमधील कंपनीसाठी इंटरव्ह्यू दिला होता. त्यात सिलेक्ट होवून त्याचा व्हिसा आला आणि शोभन दुबईला जायला निघाला. मग विश्वकर्माच्या मनातही आपण दुबईला जावे असा विचार सुरू झाला. शोभनने त्याला सगळी मदत केली आणि पासपोर्टसाठी अर्ज करून मुंबईतल्या एजंट्स चे पत्तेही दिले. इंटरव्ह्यू कसा द्यायचा याबद्दल मार्गदर्शनही केले आणि शोभन दुबईला गेला. त्याला सोडायला सगळी मित्रमंडळी विमानतळावर गेली होती, त्यात विश्वकर्माही होताच. विमानतळावरचा झगमगाट बाहेरूनच पाहून त्याचे डोळे दीपले आणि एका मोहमयी स्वप्ननगरीत तो हरवून गेला. कसेही करून आपणही परदेशी जायचेच या वेडाने तो पुरता झपाटला.

काही दिवसात पासपोर्ट मिळाला, मग इतर कागदपत्रे जमवून विश्वकर्माने धडाधड इंटरव्ह्यू द्यायला सुरुवात केली. पहिल्या सहासात वेळेला तो फेल झाला. पण तरीही जिद्द न सोडता त्याने इंटरव्ह्यू देणे सुरूच ठेवले. आताशा त्याला कोणते प्रश्न विचारले जातात, आणि त्यांना कशी उत्तरे द्यायची, हे समजले. शेवटी एका इंटरव्ह्यूमध्ये सौदी अरेबियामधल्या एका कंपनीसाठी तो सिलेक्ट झाला बुवा. २००० सौदी रियाल पगार! त्यादिवशी त्याला आकाशाला हात टेकल्यासारखे झाले. मग काय? आयुष्यात पहिल्यांदा त्याने दारू प्यायली. सगळ्या मित्रमंडळींना पार्टी देवून स्वत:ही झिंगला.

मग काही दिवसात त्याचाही व्हिसा आला आणि १ डिसेंबरचे २००७ चे विमानाचे तिकीटही. मात्र त्यासाठी एजंटला फी म्हणून ५०, ०००/- रुपये द्यायचे होते. मग लोन काढून ते पैसे भरले. आता विश्वकर्मा अतिशय आनंदात होता. लगेच तो चार दिवसासाठी घरी युपीला जावून घरच्यांना भेटून आला आणि ठरल्याप्रमाणे १ डिसेंबरला विमानात बसलाही!

सौदीच्या दम्मम विमानतळावर तो उतरला. आपल्या मोहमयी स्वप्ननगरीत आपण प्रत्यक्ष पोहोचलो आहोत, हे पाहून त्याला आनंदाने वेड लागायचे बाकी राहिले होते. या गडबडीतच विमानतळावरचे सोपस्कार पार पडले, आणि बाहेर पडल्यावर एक ड्रायव्हर आलीशान गाडीसह त्याचीच वाट पहाट होता. नशीब तो हिन्दी-उर्दू बोलणारा एक

पाकिस्तानी होता. विश्वकर्माने आपले सामान आणि पासपोर्ट त्या ड्रायव्हरकडे दिला आणि आता कंपनीत जावू, म्हणून ते निघाले....

हळूहळू शहर मागे पडू लागले आणि सौदीचा भयाण रखरखीत वाळवंट सुरू झाला. 'आपण नक्की कुठे जातो आहोत?' असे त्याने ड्रायव्हरला विचारलेदेखील. पण थातुरमातुर उत्तरे देवून ड्रायव्हरने त्याला गप्प केले. जवळजवळ सहा तास गाडी पळत होती. रात्री एक वाजता मुंबईहून तो निघाला होता आणि एव्हाना दुपारचे दोन वाजले होते. त्यामुळे पोटात भुकेचा आगडोंब पेटला होता. ड्रायव्हरने त्याला प्यायला पाणी दिले आणि जेवण मालकाच्या घरी करू असे संगितले....

मालकाच्या घरी? पण मला तर कंपनीत कामाला जॉइन करायचे आहे ना? विश्वकर्माच्या डोक्यात विचारांचे काहूर माजले. भीती आणि शंका यांनी तो अस्वस्थ झाला. पण तेवढ्यात सौदीच्या वाळवंटात फुललेली हिरवीगार शेती दिसू लागली. संत्री,मोसुंबी,सफरचंदे आणि खजुरच्या बागा. तेवढच जरा हिरवळ बघून मन हलके झाले. काही मिनिटातच मालकाचे घर आले. ते एका श्रीमंत अरबाचे घर होते. भला-थोरला बंगला, ५-६ गाड्या, नोकर-चाकर... फार मोठे प्रस्थ होते...

गाडीतून उतरल्यावर त्याला बंगल्याच्या मागच्या बाजूला असलेल्या एक झोपडीवजा खोलीत नेले. त्याचे सामान तिकडे ठेवून पासपोर्ट मालकाकडे जमा केला गेला. मेरी कंपनी किधर है? आप मुझको इधर किधर लेके आया? या विश्वकर्माच्या प्रश्नांकडे कोणीही लक्ष

दिले नाही. बंगल्यात सर्वत्र २४ तास ए.सी. आणि थंड /गरम पाण्याची सोय असली तरी झोपडीत मात्र एकच पंखा, एक बल्ब आणि एक स्टोव्ह आणि पाण्याचा एक नळ होता. जे जेवण मिळाले ते खावून विश्वकर्मा जो गाढ झोपला, तो जागा झाला थेट दुसऱ्या दिवशी सकाळी. ड्रायव्हर त्याला उठवण्यासाठी हाका मारत होता. ...चलो जलदी करो... खेतपे जाना है, काम के लिये .

आपण पुरते फसलो आहोत, याची कल्पना आता विश्वकर्माला आली. त्याची मोहमयी स्वप्नांची नगरी कुठल्याकुठे विरून गेली. त्याने ड्रायव्हरच्या माध्यमातून अरबाला काही सांगण्याचा प्रयत्नही केला. पण उपयोग शून्य! उलट 'तेरेको इंडिया से लाया वो क्या खिलाने-पिलाने? चल साला काम पे नही तो मार पडेगी!' अशी धमकीही मिळाली. आता मात्र विश्वकर्मा घाबरला. नाइलाजाने कुदळ –फावडी खांद्यावर मारून शेतात गेला आणि पडेल ते काम करू लागला. दोन-तीन महीने गेले, पगाराचे नाव नाही. अरब फक्त त्याला जेवण बनवण्यासाठी धान्य द्यायचा आणि झोपडीत असलेल्या तुटपुंज्या सुविधांवर विश्वकर्मा जगत होता.

घरी /मुंबईला फोन /पत्राद्वारे कळवावे तर अरबाचा कडा पहारा. त्याच्या नजरेतून कुठलीही गोष्ट अजिबात सुटत नसे. कधीकधी चाबकाचे फटकेही खावे लागायचे. विश्वकर्माचे हाल कुत्राही खात नव्हता.....

असेच सहासात महीने गेले आणि मग शेतीच्या कामांचा सीझन संपल्यावर त्याला उंट चरवायचे काम देण्यात आले. ... आज उंट चरवता-चरवता तो जरा इकडे लांबवर आला आणि नेमका आमच्याशी संपर्कात आला. आम्हाला त्याने कळवळून विनंती केली, साब आप किसीको बताना नही, वरना मेरी जान चाली जाएगी. एक बार हायवेसे जानेवाले एक पंजाबी ड्रायव्हर को मेरी कहानी बता रहा था, तो मालिकने देखा और बहूत मारा मुझे साबजी....

विक्रांत म्हणाला, "घाबरू नकोस, तुला परत भारतात जायचे आहे का? मी व्यवस्था करतो." कसाबसा तो तयार झाला. आणि उंट घेवून परत गेला.

आम्ही मग जेद्दाहचा long drive च प्लॅन कॅन्सल करून रात्रीपर्यंत विश्वकर्माच्या प्रॉब्लेम वर विचार केला. दुसऱ्या दिवशी मग विक्रांतने Indian Embassy मधल्या सूरज मेनन या त्याच्या मित्राला फोन करून सगळी हकिगत कळवली. अरबाचा पत्ता आणि विश्वकर्माचा ठावठिकाणा कळवला. चार-पाच दिवसातच वेगाने घडामोडी होवून विश्वकर्माचा पासपोर्ट आणि कागदपत्रे अरबकडून परत मिळवण्यात आली.

आम्ही दोघांनी थोडे पैसे त्याला दिले. त्या पंजाबी ड्रायव्हर लोकांनीही माणुसकी म्हणून पैसे जमवून दिले. सगळे मिळून ५०,

०००/- भारतीय रुपये त्याला दिले आणि तुझे कर्ज पहिले फेड बाबा आणि पुन्हा नीट चौकशी केल्याशिवाय कुठल्यातरी एजंटच्या नादी लागून इकडे येण्याची स्वप्ने बघू नकोस असा सल्ला त्याला दिला. तिकटाची व्यवस्था Indian Embassyने केली होती. जवळजवळ एका वर्षाचा वनवास भोगून, सगळया स्वप्नांचा चुराडा झालेला विश्वकर्मा भारतात परत गेला... पण त्याची सुटका केल्याचे अनामिक समाधान मात्र आम्हाला झाले. न जाणो, त्यादिवशी मी फेरफटका मारायला कॅम्पबाहेर न येता तसाच विक्रांतबरोबर long driveला गेलो असतो तर? ....तर विश्वकर्मा आणखी किती वर्षे तसाच अडकून पडला असता काय माहीत ???

.............................................................

असे अनेक विश्वकर्मा परदेशीच्या मोहमयी स्वप्नांच्या भूलभुलैयात फसून कुठेकुठे अडकून पडलेले असतील ...

ईश्वर त्यांना परत त्यांच्या मुला-माणसात परत आणो ही प्रार्थना .....!!!

# अवलिया

“नमस्ते ,मी चंदू खानविलकर”

अबुधाबीसाठी जेट एअरवेजची फ्लाइट पकडण्यासाठी एअरपोर्टवर उभा असताना एक चाळीशीचा चष्मेधारी मराठी माणूस जवळ येवून उभा होता. त्याने माझ्या पासपोर्ट वरील नाव पाहून लगेच हस्तांदोलनासाठी हात पुढे करून स्वत:ची ओळख करून दिली.

“तुम्ही Costain साठी जाताय का?” तो म्हणाला

“होय! पण तुम्हाला पूर्वी कुठेतरी पाहिल्यासारखे वाटतेय” – मी

“हो, आपण कतारला भेटलोय आधी. तुमच्या कॅम्पमध्ये तो अन्वर होता ना, त्याच्या रूमवर आलो होतो मी एकदा.” तो म्हणाला

“अच्छा. मग आत्ता कुठे चाललात ?”

"आत्ता मीही Costain लाच चाललोय, आयलंडला."

सकाळी सातची फ्लाइट होती. नशिबाने दोघांचे सीट नंबरही जवळजवळ असल्याने पूर्ण फ्लाइटभर गप्पा चालूच राहिल्या, एव्हाना आमची चांगलीच दोस्ती झाली होती. तीन तासात विमान अबुधाबी एअरपोर्टवर उतरले आणि आम्ही सर्व सोपस्कार पार पाडून आणखी तासभराने आम्ही बाहेर पडलो. Costain चा को-ऑर्डिनेटर आलाच होता. मग एका कोस्टर (मिनिबस)मधून आम्ही सर्वजण शेख जायेद सिटीमधल्या आलीशान व्हिला मध्ये पोहोचलो. एव्हाना बारा वाजत आले होते. आल्याबरोबर आम्ही शॉवर घेवून लगेच लंच घेतला आणि मस्तपैकी ताणून दिली.

संध्याकाळी चार वाजता जाग आली ती चंदूने उठवल्यामुळे! चंदूने त्याची बॅग उघडली होती. बॅगमधून काही आयुर्वेदिक औषधांच्या बाटल्या बाहेर काढल्या... सोबत ग्लास आणि फँटाचे कॅन होते जे व्हिलामधून घेतले होते. चंदू मला म्हणाला, "आता गम्मत बघ...."

त्याने औषधांच्या बाटल्यामधून औषध ग्लासात ओतले आणि त्यात फँटा मिसळून मला दिले...

"अरेच्चा ........ व्होडका?"

“अरे तीच तर गम्मत आहे.......”, चंदू म्हणाला, “अरे एअरपोर्टवर चेकिंग मध्ये सापडू नये, म्हणून मी औषधांच्या बाटलीतून व्होडका आणतो........ चल एंजॉय कर आता.......!”

.....चंदू ही वेगळीच चीज आहे, हे मी एव्हाना ओळखले होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी ऑफिसला जायचे होते. तिथली कामे आवरून दोन तासांनी आम्ही फ्री झालो.

चंदू म्हणाला, “अरे चल, जरा जिवाची दुबई करून येवू... झोपतोस काय शुंभासारखा......”

मग घाईघाईने तयार होवून आम्ही बस पकडली आणि दोन वाजता मेन सिटीला पोहोचलो. थोडावेळ कॅरिफोर आणि लुलू हायपरमार्केटमध्ये घालवून मग चंदू म्हणाला, “अरे इथे काय वेळ घालवतो आहेस? असली माल इधर नही, कही और मिलता है, चलो...............”

मग त्याने मला मुसाफामधल्या ईस्ट आफ्रिकन स्टोअरमध्ये नेले. अरे बापरे ! एखाद्या मॉलसारखे आलिशान लिकर स्टोअर? देशोदेशीचे अप्रतिम ब्रॅंड तिथे कलात्मक पध्दतीने मांडून ठेवले होते. टकीला, व्होडका, रम, जिन, स्कॉच, व्हिस्की, बियर आणि इतर अनेक प्रकार! मग काही निवडक बाटल्या घेवून आम्ही पेमेंट केले आणि निघालो...

आयलंडला जायला अजून आठ-दहा दिवस तरी होते. तेवढ्या वेळेचे नियोजन करून चंदूने बेगमी करून ठेवली होती.

पुढचे दहा दिवस मस्त मजेत गेले. आम्ही दोन दिवस दुबईची सैर करून आलो. अबुधाबी-दुबई अंतर दोनशे किमी. बसने २५ दिरम तिकीट लागते. पण या आनंदाला गालबोट लावणारी एक घटना दहाव्या दिवशी घडली. आमच्या व्हिलाच्या मागच्या बाजूला काही बलूची लोकांची वस्ती होती. तिथली उनाड पोरे एकट्या दुकट्या परदेशी माणसाला धमकावणे/लुटणे असे प्रकार करायची. प्रसंगी अंडी फेकून मारणे / मारहाण करण्यापर्यन्त मजल जायची. त्या दिवशी आम्ही दोघे संध्याकाळी फेरफटका मारायला बाहेर पडलो होतो. तेवढ्यात दहाबारा वर्षांचे सात-आठजण आले आणि मला धमक्या देवू लागले. एकाने अंडे फेकूनही मारले. बाकीचे पैशाची मागणी करू लागले. चंदूने तेवढ्यात प्रसंगावधान राखून एकेकाला लाथा-बुक्क्यांनी तुडवायला सुरुवात कली. दोघे-तिघे आडवे होताच बाकीच्यानी घाबरून पळ काढला. मी चंदूचे आभार मानले..................!

तर असा हा चंदू , त्या रात्री चंदूने मला आपली स्टोरी सांगितली. चंदू सर्वप्रथम कुवेतला गेला १९९८ ला. तिकडे जावून स्वारी जरा सेटल होतेय न होतेय, तोच एका मिसरी (इजिप्शियन) मांत्रिकाच्या नादाला लागली. चंदूचे लग्न तेव्हा व्हायचे होते. म्हणून तुला चांगली मुलगी मिळवून देतो असे सांगून अली नावाच्या या मांत्रिकने कुवेतमध्ये चंदूकडून भरपूर पैसा उकळला. पण चंदूचा त्याच्यावर गाढ विश्वास होता. त्याची आणि चंदूची चांगली दोस्तीच जमली म्हणाना! मग

अलीने चंदूला नमाज आणि त्यांचा पवित्र ग्रंथ याचे महत्त्व मनावर बिंबवले. चंदूला एक लॉकेट/ताईत आणि पवित्र ग्रंथ त्याने दिला. त्याच्या खोलीत हे सर्व सामान सदैव असे. कुवेतमध्ये सुद्धा दररोज सकाळ-संध्याकाळ धूप/लोबान लावून त्याचे पठन सुरू असे!

चंदूला हळूहळू (त्याच्या भाषेत) दिव्य अनुभव यायला सुरुवात झाली. सर्वप्रथम एका अमावास्येच्या रात्री जेव्हा अलीने चंदूच्या हृदयावर हात ठेवून पवित्र मंत्र म्हटला, त्यावेळी चंदूच्या सर्वांगातून थंड लहरी प्रक्षेपित झाल्या. त्यानंतर त्याला एका दिव्य पुरुषाचे दर्शन झाले. दिव्य शक्तीने तुला माझ्याशी जोडले आहे, आत्ता पासून तुला माझे संरक्षण व मदत मिळेल, असे त्या जिनने चंदूला संगितले! त्यानंतर चंदू सतत त्या शक्तीच्या संपर्कात असल्याप्रमाणे वागू लागला. त्याला दिव्य स्वप्ने पडू लागली. हळूहळू तो कुवेत मधील जॉब, मुंबईतले कुटुंबिय आणि सभोवतालच्या जगापासून विभक्त होत गेला. सतत अली आणि जिन यांच्या विचारातच राहू लागला. साहजिकच त्याचा परिणाम कामावर होवू लागला, कामावरून त्याचे चित्त उडाले.

आता तो जिन त्याला सांगत होता की इथे काही लोक तुझे शत्रू आहेत. त्यांनी कट करून तुला कामावरून काढून टाकायचे ठरवले आहे. यासाठी तू तुझ्या कामाच्या ठिकाणावरील एक वस्तु आणून अलीला दे. मग कामावरील मंडळी तुझ्या बाजूने वश होतील! त्यानुसार चंदूने त्यांच्या वर्कशॉप मधील एक हातोडी चोरली आणि ती आपल्या रूमवर ठेवली. अलीने रूमवर येवून त्या हातोडीला काही धागे बांधून लोबान

दाखवला आणि मंत्र म्हटले. आणि आता तुझे काम झाले आहे,असे सांगितले.

इकडे चंदूचे हे सर्व उद्योग सहकारी कर्मचाऱ्याच्या नजरेतून सुटले नव्हते. चंदूच्या नाना भानगडीनी ते वैतागले होते. त्यांनी सुपरवायझरकडे 'चंदूचे कामावर अजिबात लक्ष नाही' अशी तक्रार केली. त्यावरून सुपरवायझरने चंदूला चांगलेच झापले आणि आठ दिवसात स्वत:ला सुधार आणि कामावर लक्ष दे, नाहीतर तुला कामावरून काढून टाकीन आणि भारतात परत पाठविन अशी सक्त ताकीद दिली.

झाले, आता चंदू पिसाळला! सर्वप्रथम अलीशी हुज्जत घातली आणि मग त्याला प्रचंड शिव्या देतच रूमवर आला. रागाच्या भरात ग्रंथ आणि हातोडी, धूप/लोबान सगळे उचलून कचऱ्याच्या डब्यात टाकले. हे सगळे बाजूच्या रूमवर राहणारे बाकीचे कर्मचारी पहात होते. एकाने कुणीतरी कुवेतच्या पोलीसला बोलावून आणले आणि 'चंदूने पवित्र ग्रंथाचा अपमान केला आहे, त्याची झडती घ्या' अशी तक्रार केली. मग पोलिसाने रूमची आणि कचरापेटीची तपासणी केली, तर खरोखरच ग्रंथ आणि हातोडी सापडली. झाले ! मग चंदूची रवानगी पोलिस स्टेशनवर! पण त्याची जबानी घेताना उलटसुलट वक्तव्ये आणि बोलण्यातील विसंगती पाहता ही सायकिक केस आहे, हे स्पष्ट झाले. मग पुढे काही जास्त कारवाई न होता चंदूला नोकरीवरून काढून टाकण्यात आले आणि त्याची रवानगी पुन्हा भारतात करण्यात आली!

भारतात आल्यावर चंदूला मनोविकार तज्ज्ञाकडे नेण्यात आले, त्याला बरेच दिवसात हॉस्पिटलमध्ये राहावे लागले. अनेक गोळ्या आणि injections यांचा मारा करण्यात आला. दोन-अडीच महिन्यात तो नॉर्मल वर आला. मग घरच्यांनी त्याचे लग्न करून देण्याचे ठरवले. एक बेळगावची मुलगी पाहून एका शुभ मुहूर्तावर चंदू विवाहबद्ध झाला. पण हे लग्न फार काळ टिकले नाही. सहा महिन्यातच चंदूचा घटस्फोट झाला. आणि मग पुन्हा चंदू सौदी अरेबियाला पुन्हा दोन वर्षांसाठी निघून गेला.

आज चंदू ब्राजिलमध्ये आहे ! अधूनमधून फोन करतो पण चंदूचा फोन आल्यावर माझी ती संध्याकाळ अस्वस्थ जाते. मनात कुठेतरी नक्की वेडा कोण असा प्रश्न पडतो?

त्याला वेडा ठरवणारे हे जग की जगाला फाट्यावर मारून आपल्याच धुंदीत आयुष्य जगणार चंदू ?

## ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी भाषा फ़ार सुंदर आहे. गेल्या तेविसशे वर्षांत या भाषेने महान लेखक कवींना जन्म दिला. वाचकांनी त्यांना डोक्यावर घेतले. या महान संत कवींनी दाखवलेल्या मार्गाने मराठी माणूस चालला, वागला. त्याचा पिंड घडला. शिक्षण झाले. संस्कार झाले.

हा वारसा पुढे चालायला हवा. नवे नवे लेखक कवी पुढे यायला हवे. त्यांच्यामार्फ़त नवीन विचार, नवे अनुभव समोर यायला हवेत. तसे नवीन नवीन लेखक लिहीत असतातही.

नवीन लेखकांना वाचकांसमोर येण्यासाठी ई साहित्य प्रतिष्ठान हे एक व्यासपीठ आहे. पावणे दोन लाख वाचकांपर्यंत पोचण्याचा एक मार्ग. आपले अनुभव लोकांपर्यंत नेण्याचा. आपल्या अनुभवांचा इतरांना फ़ायदा देण्याचा.

वाचकांनाही नवनवीन लेखकांचे साहित्य मिळण्याचा हा एक सोपा मार्ग आहे. सुलभ. विशेषतः परदेशात रहाणारे मराठी वाचक आणि खेड्यापाड्यातले तरूण हे आता मोबाईलद्वारे ही ई पुस्तके वाचू शकतात.

ई साहित्याचा प्रसार करायला आम्हाला मदत करा. आपल्या ओळखीच्या आठ ते दाहा लोकांच्या ई मेल आय डी आम्हाला कळवा. आम्ही त्यांना चांगली चांगली पुस्तके विनामूल्य पाठवू.

esahity@gmail.com